# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३०० - २३** **दिनांक : - ०५/०९/२०२३**

**पोलीस अंमलदारास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यात लोखंडी रॉडने गंभीर दुखापती करुन, जबरीने मोबाईल चोरी करुन पळुन गेलेल्या आरोपीतास गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१ कडुन २४ तासाचे आत अटक**

दिनांक ०४/०९/२०२३ रोजी ०१.३० वा.ते ०२.०० वा.च्या दरम्यान संशयीत आरोपी नामे हैफल कालु अली वय-२७ वर्षे रा. शिवसेना गल्ली, भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे याचेकडे मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजी नं. ३१९/२०२३ भा.द.वी.स. कलम ३७९ या गुन्हयाच्या संदर्भात तपास करण्याचे आपले कर्तव्य बजावित असतांना संशयित आरोपीत यास का पकडले आहे ? या गोष्टीचा आरोपीत याने राग मनात धरुन पो.हवा.१००५० जयकुमार राठोड नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी रॉडने डोक्यात मारुन त्यांस गंभीर जखमी करुन त्यांचे खिश्यातील मोबाईल फोन व पैसे जबरीने खेचुन तेथुन पळुन गेला. म्हणुन त्याचे विरुध्द फिर्यादी पो.हवा. १२०१० अनिल रामदास नागरे नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा, मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय यांनी दिले फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र ३२७/२०२३ भा.द.वि.स कलम ३०७,३९४,३५३,३३३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे दाखल गुन्हयांची गंभीरता लक्षात घेवुन मा. पोलीस आयुक्त श्री मधुकर पांडेय तसेच मा.अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक यांनी गुन्हे शाखेतील सर्व युनीट व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीताचा शोध घेणेबाबत आदेशीत केले.

मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे अविनाश अंबुरे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे अमोल मांडवे यांचे आदेशाने गुन्हे शाखेच्या सर्व युनीटची अनेक पथके तयार करण्यात आली होती.

मा. वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-०१ चे अधिकारी व अंमलदार यांचे विषेश पथक तयार करुन त्यांना सदर गुन्हयांतील आरोपीत यांचा शोध घेण्यासाठी आदेशीत केले होते. सदर गुन्हयांतील आरोपीत नामे हैफुलअली कालुअली शेख वय-२५ सध्या फिरस्ता रा. शिवसेना गल्ली, भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे. मुळ रा. कुतुबशहर, पोलीस ठाणे गाजौल, जिल्हा मालदा, राज्य पश्चिम बंगाल पिनकोड-७३२१०२ हा गुन्हा करुन पळुन जात असतांना त्याचे मार्गावरील मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज तांत्रीक विश्लेषन करीत असतांना आरोपीत हा त्याचे मुळ गावी जिल्हा मालदा, पश्चिम बंगाल येथे पळुन जात असतांना छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनन्स, मुंबई येथे दि. ०४/०९/२०२३ रोजी २१.३० वा. मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच आरोपीताची वैद्यकीय तपासणीकरुन त्यास रिपोर्ट सह मिरारोड पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे स.पो.निरी पुष्पराज सुर्वे, स.फौ.राजु तांबे, स.फौ संदीप शिंदे, पो.हवा.अविनाश गर्जे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन हुले, सुधिर खोत, विकास राजपुत, पो.अं.प्रशांत विसपुते, तसेच स.फौ.संतोष चव्हाण, सायबर विभाग, तसेच म.सु.ब.चे किरण आसवले तसेच गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.




**----0000----**